## नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई यांचे समोर

वाचा :- १) या कार्यालयाचे दक्षता शाखेकडून दि.११/०७/२०११ रोजी प्राप्त झालेलें कागदपत्रे.
२) या कार्यालयाची "कारणे दाखवा नोटीस" क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.५०/२०११/जा.५७६, दि.२२/०५/२०११.
३) तपासी पोलिस अधिकारी तथा पोलिस उप निरीक्षक, उल्हासनगर पोलीस स्टेशन यांचे दि.०२/०८/२०११ रोजीचे लेखी अभिवेदन.
४) संजय चंद्रलाला काररा व स्विफ्ट डिझायन गाडी क्र. एमएच-०५-अेएस-४१९३ चे मालक शंकर खटुमल कुकरेजा यांचे दि.०२/०८/२०११ रोजीची स्वतंत्र लेखी निवेदने.

क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.५०/२०११/जा ६४८
नियंत्रक शिधावाटप व संचालक
नागरी पुरवठा यांचे कार्यालय,
रॉयल इन्शुरन्स इमारत, ५ वा मजला,
१४, ज.टाटा मार्ग, चर्चगेट, मुंबई - २०.
दिनांक : ११ /०८/२०११.

## आदेश

(जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ अन्वये)

### प्रकरणाची पार्श्वभूमी :-

उल्हासनगर २ येथील परिसरात केरासिनची बेकायदेशिररित्या वाहतूक व विक्री होत असल्याची खात्रीलायक खबर दिनांक ०६/०७/२०११ रोजी या कार्यालयास मिळाल्यावरुन या कार्यालयाच्या फिरत्या पथकातील अधिकारी/कर्मचारी पंचासह तेथूनच जवळच असलेल्या बॅरेक नं. ७४२ च्या समोर, झुलेलाल स्कूल रोड, उल्हासनगर या ठिकाणी १२:१५ वाजता उभे राहून मिळालेल्या माहितीनुसार थोडावेळ टेहाळणी करीत थांबले असता, साधारणपणे १२:४० वाजताच्या सुमारास एक इसम व्हाईट हाऊस बिल्डिंग कडून पांढऱ्या रंगाची स्विफ्ट डिझायन गाडी बॅरेक क्रमांक ७४२, झुलेलाल स्कूल रोड, उल्हासनगर २ च्या दिशेने येत असल्याची दिसून आली. सदर स्विफ्ट डिझायन गाडी क्र. एमएच-०५-अेएस-४१९३ बॅरेक क्रमांक ७४२ च्या समोर थांबवून सदर गाडीमध्ये काय आहे, याबाबत विचारणा केली असता, गाडीतील इसमाने गाडीची डिकी उघडून दाखविली. सदर गाडीच्या डिकीमध्ये ३५ लिटर्स क्षमतेचे काळ्या रंगाचे प्लॅस्टिकचे ६ कॅन आढळून आले. त्यापैकी पूर्ण भरलेले ३ कॅन व अपूर्ण

भरलेले १ कॅन व त्यामधील एकूण १३० लिटर्स केरोसिन मिश्रित द्रवपदार्थ आढळून आले. तसेच २ रिकामे कॅन आढळून आले.

सदर इसमास त्याचे नांव गांव व कॅनमधील केरोसिनमिश्रित द्रवपदार्थ कोठून आणला, याबाबत विचारणा केली असता, त्याने त्याचे नाव संजय चंद्रलाला कारला असे पंचासमक्ष सांगून, तो गेल्या १० दिवसापासून उल्हासनगरमधील चहावाले भजियावाले या टपरीधारकांना केरोसिन मिश्रित द्रवपदार्थ विक्री करतो. सदरचे केरोसिन उल्हासनगरमधील फेरीवाल्यांकडून प्रति लिटर्स रुपये २५/- या दराने खरेदी करुन टपरीधारक ग्राहकांना रुपये २७/- प्रति लिटर्स या दराने विक्री करतो. फेरीवाल्यांकडून घेतलेले निळ्या रंगाचे केरोसिन कळू नये म्हणून त्यामध्ये काळे तेल मिश्रित करण्यात येते. तसेच केरोसिन खरेदीबाबत कोणतीही कागदपत्र त्याच्याकडे उपलब्ध नसल्याचे सांगितले. याबाबत त्याचा जबाब पंचासमक्ष नोंदवून घेण्यात आला.

अशाप्रकारे संजय चंद्रलाला कारला यांनी शासन नियंत्रित दराचे केरोसिन अवैधमार्गाने प्राप्त करुन त्यामध्ये काळे तेल मिश्रित करुन बेकायदेशिररित्या त्याची विक्री करण्याच्या उद्देशाने वाहतूक करीत असल्याचे निष्पन्न झाल्याने, पर्यायाने त्यांनी शासनाची तसेच उपभोक्त्यांची फसवणूक केल्याचे सिध्द होत असल्याने संबंधितांविरुध्द (१) जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ३, ७, ८, ९ (२) बॉम्बे रेशनिग एरिया शेडयुल्ड कमोडीटीज रेग्यूलेशन ऑफ डिस्ट्रीब्युशन ऑर्डर १९८६ चे कलम ४, ५, ६, ७, ८ (३) दि केरोसिन (रिस्ट्रीक्शन ऑन युज अ‍ॅण्ड फिक्सेशन ऑफ सिलिंग प्रायजेस) ऑर्डर, १९९३ चे कलम ३ तसेच (४) महाराष्ट्र सार्वजनिक वितरण व्यवस्था (पी.डी.एस.) केरोसिन घाऊक विक्रेता, अर्धघाऊक विक्रेता व हॉकर्स (अनुज्ञापन) आदेश, २००९ चे कलम ३ चा भंग केल्यावरुन त्यांचेविरुध्द उल्हासनगर पोलिस स्टेशन, ठाणे येथे गुन्हा नोंद क्र. II ४७/२०११ दि.०६/०७/२०११ अन्वये गुन्हा नोंद करुन खालील मुद्देमाल जप्त करण्यात आला. तसेच जप्त साठयातून पंचासमक्ष नमुने घेण्यात आले.

| अ. क्र. | जप्त मुद्देमाल तपशिल | नग / साठा | जप्त मुद्देमालाची एकूण किंमत (रुपये) |
|---|---|---|---|
| १ | प्रत्येकी ३५ लि. क्षमतेच्या ३ प्लॅस्टिकच्या काळ्या कॅनमध्ये असलेले केरोसिन मिश्रित द्रवपदार्थ (पूर्ण भरलेले कॅन) | १०५ लिटर्स | ३,९९०/- |
| २ | ३५ लि. क्षमतेच्या १ प्लॅस्टिकच्या काळ्या कॅनमध्ये अपूर्ण भरलेला केरोसिन मिश्रित द्रवपदार्थ | २५ लिटर्स | ९५०/- |
| ३ | मारुती सुझुकी कंपनीची पांढऱ्या रंगाची स्विफ्ट डिझायन गाडी क्र. एमएच-०५-अेएस-४१९३ | १ नग | ४,००,०००/- |
| ४ | ३५ लि. क्षमतेच्या काळ्या प्लॅस्टिकच्या कॅनची किंमत | ६ नग | ६००/- |
| | | एकूण | ४,०५,५४०/- |

उपरोक्त जप्त मुद्देमालाची जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ प्रमाणे विल्हेवाट लावण्याची विनंती उपनियंत्रक शिधावाटप (अंमलबजावणी), मुंबई यांनी वाचावे क्र.१ मध्ये नमूद अहवालान्वये केली असून त्यानुषंगाने जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-ब नुसार सर्व संबंधितांना वरील वाचावे क्र. २ मध्ये नमूद केल्याप्रमाणे कारणे दाखवा नोटीस बजावून या प्रकरणी जप्त करण्यात आलेला मुद्देमाल सरकारजमा का करण्यात येऊ नये, याची कारणे स्पष्ट करणारा खुलासा मागविण्यात आला. तसेच मौखिक खुलासा करण्याची संधी म्हणून दि. ०२/०८/२०११ रोजी या कार्यालयात सुनावणी ठेवण्यात आली.

दि०२/०८/२०११ रोजीच्या सुनावणीस उल्हासनगर पोलिस स्टेशनचे पोलिस कॉस्टेबल, श्री. एन. आय. काझी उपस्थित राहिले व त्यांनी तपासी पोलिस अधिकारी यांचे वाचा क्र. ३ मध्ये नमूद लेखी अभिवेदन सादर केले.

तसेच दिनांक ०२/०८/२०११ रोजीच्या सुनावणीस संजय चंद्रलाला काररा व स्विफ्ट डिझायन गाडी क्र. एमएच-०५-एएस-४१९३ चे मालक शंकर खटुमल कुकरेजा हे उपस्थित राहिले व त्यांनी त्यांचे वाचा क्र. ४ मध्ये नमूद स्वतंत्र लेखी निवेदन सादर केले.

सबब, प्रकरण निर्णयास्तव राखीव ठेवण्यात आले.

युक्तिवाद :-

दिनांक ०२/०८/२०११ रोजीच्या सुनावणीस उपस्थित पोलिस कॉस्टेबल श्री. एन. आय. काझी यांनी सादर केलेल्या तपासी पोलिस अधिकारी यांचे अभिवेदनात, प्रस्तूत गुन्ह्यात जप्त केलेल्या मुद्देमालाबाबत योग्य तो निर्णय होणेस विनंती आहे, असे नमूद केले आहे.

दिनांक ०२/०८/२०११ रोजीच्या सुनावणीस उपस्थित संजय चंद्रलाला काररा यांनी युक्तिवाद केला की, प्रस्तूत गुन्ह्यात जप्त केलेले केरोसिन हे तो काही शिधापत्रिकाधारक यांचेकडे शिल्लक असणारे १ लिटर, २ लिटर रुपये २५/- या दराने खरेदी करतो व रुपये २७/- या दराने चहावाले, टपरीधारक यांना विकून त्याचा कुटुंबाचा उदरनिर्वाह करतो. त्याने बेकायदेशिररित्या कोणत्याही प्रकारची केरोसिनची विक्री करण्याच्या उद्देशाने कोणतेही काम केलेले नाही व यापुढे तो अशाप्रकारे केरोसिनची विक्री करणार नाही. नोटीसमध्ये नमूद केलेल्या गाडीचा वा इतर कोणत्याही वाहनाचा वापर केलेला नाही, असे सांगून तसे लेखी निवेदन सादर केले.

दिनांक ०२/०८/२०११ रोजीच्या सुनावणीस उपस्थित स्विफ्ट डिझायन गाडी क्र. एमएच-०५-एएस-४१९३ चे मालक शंकर खटुमल कुकरेजा यांनी युक्तीवाद केला की, त्याची गाडी क्र. एमएच-०५-एएस-४१९३ ही बॅरेक नंबर ७४२ च्या समोरुन जप्त करण्यात आली आहे. त्याचे संजय चंद्रलाला काररा हे मित्र असून त्याच्या घरच्या

व्यक्तीची तब्येत बरोबर नसल्याने दवाखान्यात घेऊन जाण्याकरिता सदर गाडी संजय चंद्रलाला काररा हे घेऊन गेले होते. तो त्याच्या गाडीतून कोणतेही प्रकारचे केरोसिन वाहून नेत नव्हता व अशाप्रकारचे काणतेही अवैध धंदे तो करीत नाही. तरी त्याची जप्त करण्यात आलेली स्विफ्ट डिझायन गाडी त्याच्या ताब्यात देण्यात यावी, असे सांगून तसे लेखी निवेदन सादर केले.

## निष्कर्ष :-

प्रस्तुत प्रकरणातील आरोपी/अपचारी यांचे निवेदन, तपासी पोलीस अधिकारी यांचे अभिवेदन व अभिलेखावरील उपलब्ध पुरावादर्शक कागदपत्रे विचारात घेऊन मी खालील प्रमाणे निष्कर्ष काढीत आहे.

प्रस्तुत प्रकरणी दिनांक ०६/०७/२०११ रोजी या कार्यालयास मिळालेल्या खात्रीलायक बातमीनुसार येथील अधिकारी/कर्मचारी पंचासह बॅरेक नं. ७४२ च्या समोर, झुलेलाल स्कूल रोड, उल्हासनगर या ठिकाणी १२:१५ वाजता उभे राहून टेहाळणी करीत थांबले असता, साधारणपणे १२:४० वाजताच्या सुमारास एक इसम व्हाईट हाऊस बिल्डिंग कडून पांढऱ्या रंगाची स्विफ्ट डिझायन गाडी बॅरेक क्रमांक ७४२ च्या दिशेने येत असल्याची दिसून आली. सदर स्विफ्ट डिझायन गाडी क्र. एमएच-०५-एएस-४१९३ बॅरेक क्रमांक ७४२ च्या समोर थांबवून सदर गाडीमध्ये काय आहे, याबाबत गाडी मध्ये उपस्थित इसम संजय चंद्रलाला कारला याचेकडे विचारणा केली असता, गाडीतील इसमाने गाडीची डिकी उघडून दाखविली. सदर गाडीच्या डिकीमध्ये ३५ लिटर्स क्षमतेचे काळ्या रंगाचे प्लॅस्टिकचे कॅन आढळून आले. त्यापैकी पूर्ण भरलेले ३ कॅन व अपूर्ण भरलेले १ कॅन व त्यामधील एकूण १३० लिटर्स केरोसिन मिश्रित द्रवपदार्थ आढळून आले. तसेच २ रिकामे कॅन आढळून आले. तसेच तो गेल्या १० दिवसापासून उल्हासनगरमधील चहावाले भजियावाले या टपरीधारकांना केरोसिन मिश्रित द्रवपदार्थ विक्री करतो. सदरचे केरोसिन उल्हासनगरमधील फेरीवाल्यांकडून प्रति लिटर्स रपये २५/- या दराने खरेदी करुन टपरीधारक ग्राहकांना रुपये २७/- प्रति लिटर्स या दराने विक्री करतो. फेरीवाल्यांकडून घेतलेले निळ्या रंगाचे केरोसिन कळू नये म्हणून त्यामध्ये काळे तेल मिश्रित करण्यात येते. तसेच केरोसिन खरेदीबाबत कोणतीही कागदपत्र त्याच्याकडे उपलब्ध नसल्याचे सांगितले. यावरुन सदर स्विफ्ट डिझायन गाडी क्र. एमएच-०५-एएस-४१९३ व त्यामधील १३० लिटर निळे केरोसिनने भरलेले ४ प्लॅस्टिकचे कॅन व २ रिकामे प्लॅस्टिकचे कॅन जप्त करण्यात आले.

पोलिसांनी सुनावणीच्या वेळी सादर केलेल्या अभिवेदनात, प्रस्तूत गुन्ह्यात जप्त केलेल्या मुद्देमालाबाबत योग्य तो निर्णय होणेस विनंती असल्याचे नमूद केले आहे. तसेच संजय चंद्रलाला काररा यांनी केलेल्या खुलाशात, काही शिधापत्रिकाधारक यांचेकडे शिल्लक असणारे १ लिटर, २ लिटर केरोसीन रुपये २५/- या दराने खरेदी करुन

चहावाले, टपरीधारक यांना रुपये २७/- या दराने विकून त्यांचा कुटुंबाचा उदरनिर्वाह करतो. त्याने बेकायदेशिररित्या कोणत्याही प्रकारची केरोसिनची विक्री करण्याच्या उद्देशाने कोणतेही काम केलेले नाही. तसेच नोटीसमध्ये नमूद केलेल्या गाडीचा वा इतर कोणत्याही वाहनाचा वापर केलेला नसल्याचे नमुद केले आहे. सदर गाडीचे मालक शंकर खटुमल कुकरेजा यांनी त्यांची जप्त गाडी त्यांचे मित्र संजय चंद्रलाला काररा यांनी, त्याच्या घरच्या व्यक्तीची तब्येत बरोबर नसल्यांनें दवाखान्यात घेऊन जाण्याकरिता संजय काररा हे घेऊन गेले होते. संजय काररा हा त्याच्या गाडीतून कोणतेही प्रकारचे केरोसिन वाहून नेत नव्हता, असा खुलासा जप्त गाडीचे मालकाने सुनावणीचे वेळी केला असला तरी, धाडीचे वेळी घटनास्थळी सदर स्विफ्ट डिझायन गाडी क्र. एमएच-०५-अेएस-४१९३ गाडीमध्ये १३० लिटर निळे केरोसिनने भरलेले ४ प्लॅस्टिकचे कॅन व २ रिकामे प्लॅस्टिकचे कॅन आढळून आले आहे. संजय काररा याने अनधिकृतपणे विक्री करण्यासाठी गैरमार्गाने शासन नियंत्रीत केरोसीन मिळविले असल्याचे सुनावणीचेवेळी दिलेल्या खुलाशात मान्य केले आहे. सदर स्विफ्ट गाडीमध्ये केरोसीनने भरलेले चार व रिकामे दोन कॅन आढळून आले असल्याचे तसेच निळे केरोसीन फेरिवाल्यांकडून खरेदी केल्यांनतर निळा रंग कळू नये म्हणून त्यामध्ये काळे तेल मिश्रीत करीत असल्याचा जबाब संजय काररा याने घटनास्थळी दिलेला आहे. यावरुन संजय काररा याने जाणीवपूर्वक शासन नियंत्रीत निळे केरोसिन अवैधमार्गाने मिळवून, त्यामध्ये काळे तेल मिश्रीत करुन त्याची बेकायदेशीररित्या विक्री करण्याच्या उद्देशाने वाहतूक व साठवणूक केल्याचे सिध्द होते. सबब, प्रस्तूत प्रकरणी जप्त करण्यात आलेला संपूर्ण निळे केरोसीनचा साठा शासनजमा करण्याच्या निष्कर्षाप्रत मी आलेलो आहे.

प्रस्तुत प्रकरणी जप्त करण्यात आलेली स्विफ्ट डिझायन गाडी क्र. एमएच-०५-अेएस-४१९३ ही शंकर के. कुकरेजा यांच्या मालकीची असल्याचे त्यांनी सादर केलेल्या वाहन नोंदणी प्रमाणपत्रावरुन दिसून येते. तसेच शंकर कुकरेजा यांनी सादर केलेल्या खुलाशात, त्यांचे मित्र संजय चंद्रलाला काररा याच्या घरच्या व्यक्तीची तब्येत बरोबर नसल्याने दवाखान्यात घेऊन जाण्याकरिता सदर गाडी संजय चंद्रलाला काररा हे घेऊन गेले होते. तो त्याच्या गाडीतून कोणतेही प्रकारचे केरोसिन वाहून नेत नव्हता व अशाप्रकारचे काणतेही अवैध धंदे तो करीत नाही, असा खुलासा केला आहे. जप्त स्विफ्ट डिझायन गाडीच्या मालकाने दिलेल्या निवेदनावरुन, सदर गाडी मालकाचे अपरोक्ष जरी त्याचे वाहनाचा गैरवापर झाला असला तरी, वाहन मालक या नात्याने त्यानी त्याचे वाहनाचा गैरवापर होणार नाही याची सर्वेतोपरी दक्षता घेणे आवश्यक आहे. सदर गुन्ह्यात आरोपी संजय काररा यानें शासन नियंत्रीत केरोसीनची अनधिकृतपणे व बेकायदेशीररित्या वाहतूक, साठवणूक करण्याकरीता जप्त गाडी क्र. एमएच-०५-अेएस-४१९३ चा गैरवापर केला असल्याचे स्पष्ट होते. सबब, शासनाचे परिपत्रक क्र.जीवका-१००५/प्र.क्र.४३८/ना.पु.२३, दिनांक ३० ऑगष्ट, २००५ मधील निर्देशानुसार, सदर स्विफ्ट डिझायन गाडी क्र. एमएच-०५-अेएस-४१९३ ही तीच्या

DIRECTOR OF CIVIL SUPPLIES ... FFICE

एकूण किमतीच्या ५० टक्के एवढ्या रकमेच्या राष्ट्रीयकृत बँकेच्या हमीवर तीच्या मालकास परत करण्याच्या निष्कर्षाप्रत मी आलेलो आहे.

प्रस्तुत प्रकरणी जप्त मुद्देमालाची विल्हेवाट लावण्याचे आदेश देण्यापुरतेच सदरचे प्रकरण या कार्यालयाशी सीमित असून फौजदारी गुन्हा नोंद प्रकरणी संबंधित न्यायालयात योग्य तो निर्णय होईलच. सबब, उपरोक्त विवेचन विचारात घेऊन मी, नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई, मला जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये उल्हासनगर पोलिस स्टेशन येथे गुन्हा नोंद क्र. II ४७/२०११ दि.०६/०७/२०११ मध्ये जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालासंदर्भात न्यायालयीन निर्णयाच्या अधीन राहून खालील आदेश देत आहे.

## आदेश :-

१) प्रस्तूत प्रकरणी जप्त करण्यात आलेले संपुर्ण एकूण १३० लिटर निळे केरोसिनचा साठा शासनजमा करण्यात यावा.

२) शासनजमा करण्यात आलेले सदरचे निळे केरोसिन उपनियंत्रक शिधावाटप, फ-परिमंडळ कार्यालय, ठाणे यांचे मदतीने त्यांच्या कार्यक्षेत्रातील अधिकृत शिधावाटप दुकानांस, पोलीसांनी नियंत्रीत दराने विक्री करुन येणारी रक्कम पोलीसांनी शासनजमा करावी.

३) जप्त करण्यात आलेली स्विफ्ट डिझायन गाडी क्र. एमएच-०५-ओएस-४१९३ ही तिच्या एकूण किमतीच्या ५० टक्के एवढ्या रकमेच्या राष्ट्रीयकृत बँकेच्या हमीवर तिच्या मालकास परत करण्यात यावी.

४) सदरची बँक हमी या प्रकरणी नोंदविण्यात आलेल्या गुन्ह्याचा न्यायालयीन निर्णय होईपर्यंत वेळोवेळी विहीत वेळेत नुतणीकरण करुन पोलिसांकडे देण्याची जबाबदारी वाहन मालकाची राहील.

५) या प्रकरणी नोंदविण्यात आलेल्या गुन्ह्याचा न्यायालयीन निर्णय होईपर्यंत सदरहू वाहन विक्री करता येणार नाही व कोणासही हस्तांतरण करता येणार नाही.

६) तथापी, या वाहनाच्या मालकाने अशी बँक हमी सादर न केल्यास सदर वाहनाची पोलिसांनी नियमानुसार जाहिर लिलावाने विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करावी.

७) जप्त करण्यात आलेले ६ प्लॅस्टिक कॅनची पोलीसांनी किरकोळीने विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करावी.

वरीलप्रमाणे जप्त मुद्देमालाची पोलिसांनी विल्हेवाट लावून येणारी रक्कम पोलीसांनी वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई यांचे कार्यालयाच्या वैयक्तिक ठेव लेख्यात ४४०८ या लेखाशिर्षात जमा करावी.

सही/-
नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.

प्रति,

१) संजय चंद्रलाला काररा
२) स्विफ्ट डिझायन गाडी क्र. एमएच-०५-अेएस-४१९३ चे मालक
(वरिष्ठ पोलिस निरिक्षक, उल्हासनगर पोलिस स्टेशन, ठाणे यांचे मार्फत)

प्रत,

१) वरिष्ठ पोलिस निरिक्षक, उल्हासनगर पोलिस स्टेशन, ठाणे यांना कळविण्यात येते की, सदरचे आदेश संबंधीतांवर बजावून त्याची दिनांकित पोच या कार्यालयास तात्काळ सादर करावी. तसेच आदेशाची अंमलबजावणी तात्काळ करुन पूर्तता अहवाल विनाविलंब या कार्यालयास सादर करावा.
२) उपनियंत्रक शिधावाटप, फ परिमंडळ यांना माहिती व पुढील उचित कार्यवाहीसाठी अग्रेषित.
३) वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, बंगाली गर्ल्स हायस्कूल, चर्चगेट, मुंबई यांना माहितीसाठी अग्रेषित.
४) कार्यासन अधिकारी, का.क्र.५, दक्षता शाखा, प्रधान कार्यालय, मुंबई यांना अग्रेषित.
५) निवड नस्ती.

नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.

DIRECTOR OF CIVIL SUPPLIES OFFICE